# श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर

**ता. नेवासा , जि. अहिल्यानगर पिन – ४१४१०५**

website : www.shanidev.com    E-mail : shanishingnapur@yahoo.com

## * सन २०२६ *

# निविदा क्र. ०२/२०२६

## ( फेब्रुवारी २०२६ ते जुलै २०२६ )

# बर्फीप्रसाद विभागासाठी साखर खरेदीबाबत जाहीर निविदा

**निविदा प्रसिद्ध दिनांक -   २९   जानेवारी २०२६**

A. <u>निविदेचा तपशिल– देवस्थानसाठी आवश्यक (ग्रेड – सुपर एस) पुरविणेबाबत निविदा</u>

B. **निविदा सादर करताना दोन लिफाफे पध्दतीने करण्यात यावे. त्यामध्ये लिफाफा क्रं. 1 (तांत्रिक लिफाफा) व लिफाफा क्रं. 2 (दरासंबंधीचा लिफाफा)**

**निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे तपशील खालीलप्रमाणे–**

**तांत्रिक लिफाफा क्रं. 1 –**

1. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदययावत दुकान/संस्था नोंदणी प्रमाणपत्र / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/ खाजगी कंपनी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.
2. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला सादर करणे अनिवार्य राहिल.
3. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना सादर करणे अनिवार्य राहिल.
4. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड सादर करणे अनिवार्य राहिल.
5. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन, 2022–23, 2023–24 व 2024–25 या 3 आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम ( रू. 50,00,000/– ) असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.
6. जाहीरात प्रसिध्द झालेपासून कोरे निविदा फॉर्म देवस्थान कार्यालयात कार्यालयीन वेळेत रोख रक्कम भरणा करून मिळतील. अथवा देवस्थानचे संकेतस्थळ ***<u>www.shanidev.com/tender</u>*** येथून डाउनलोड करता येतील. निविदेची फॉर्म फी रू.10000/- + 18% GST (रू. 1800) = रू.11800/- या रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) श्री.शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर या नावे **(Payable at Bank of Maharashtra, Branch - Sonai)** अथवा श्री.शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर या नावे बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा–सोनई येथील खाते क्रं. 60551872035 (IFSC CODE : MAHB0001391) वर आरटीजीएस/एनईएफटी/ऑनलाईनव्दारे जमा करावी. त्याची पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहिल. तसेच बयाणा रक्कम रु. 100000/- चा धनाकर्ष (Demand Draft) श्री. शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर यांचे नावे **(Payable at Bank of Maharashtra Sonai)** अथवा श्री.शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर या नावे बॅंक ऑफ महाराष्ट्र,शाखा–सोनई येथील खाते क्रं. 60551872035 (IFSC CODE : MAHB0001391) वर आरटीजीएस/एनईएफटी/ऑनलाईनव्दारे जमा करावी. त्याची पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहिल.
7. निविदा फॉर्म फीची रक्कम व बयाणा रक्कम भरलेल्या पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात निविदा अर्जासोबत न जोडल्यास संबंधित निविदाधारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल निविदा धारकांनी नोंद घ्यावी.
8. लिफाफा क्रं. 1 तांत्रिक लिफाफा सादर करताना त्यावर साखर खरेदीसाठी निविदा व निविदा ज्या नावाने भरली असेल त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद स्पष्टपणे नमुद करावे.
9. लिफाफा क्रं.1 मधील तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच लिफाफा क्रं. 2 मधील दरासंबंधीच्या निविदा उघडण्यात येतील.

**<u>लिफाफा क्रं. 2 दरासंबंधीचा लिफाफा –</u>**

1. परिशीष्ट ''अ'' मध्ये नमुद केल्यानुसार निविदाधारकाने स्वतः स्वाक्षरी केलेला दरासंबंधीचे प्रपत्र दरासंबंधीचा लिफाफा क्रं. 2 मध्ये सिलबंद करून सादर करावे.

2. लिफाफा क्रं.2 वर साखर दरासंबंधी निविदा व निविदा ज्या नावाने भरली असेल ते संपूर्ण नाव व पत्ता स्पष्टपणे नमुद करावे.
3. दरासंबंधीचे परिशिष्टासह प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेली मुख्य निविदा दरासंबंधीचा लिफाफा क्रमांक दोन मध्ये सादर करावी लागेल.

**C. <u>निविदा फी व बयाणा रक्कम –</u>**

1. MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.
2. न्युनतम दरधारकाने (*L-1*) पुरवठा आदेश दिल्यानंतर मालाचा पुरवठा करण्यात नकार दिल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. न्युनतम दरधारकाव्यतिरिक्त इतर निविदा धारकांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. न्युनतम निविदा धारकाची बयाणा रक्कम सुरक्षा अनामत रकमेबरोबर समायोजित करण्यात येईल.
3. जाहीरात प्रसिध्द झालेपासून कोरे निविदा फॉर्म देवस्थान कार्यालयात कार्यालयीन वेळेत रोख रक्कम भरणा करून मिळतील. अथवा देवस्थानचे संकेतस्थळ ***<u>www.shanidev.com/tender</u>*** येथून डाउनलोड करता येतील. निविदेची फॉर्म फी रू.10000/- + 18% GST (रू. 1800) = रू.11800/- या रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) श्री.शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर या नावे **(Payable at Bank of Maharashtra, Branch - Sonai)** अथवा श्री.शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर या नावे बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा–सोनई येथील खाते क्रं. 60551872035 (IFSC CODE : MAHB0001391) वर आरटीजीएस/एनईएफटी/ऑनलाईनव्दारे जमा करावी. त्याची पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहिल. तसेच बयाणा रक्कम रु. 100000/- चा धनाकर्ष (Demand Draft) श्री. शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर यांचे नावे **(Payable at Bank of Maharashtra Sonai)** अथवा श्री.शनैश्वर देवस्थान, शनिशिंगणापूर या नावे बॅंक ऑफ महाराष्ट्र,शाखा–सोनई येथील खाते क्रं. 60551872035 (IFSC CODE : MAHB0001391) वर आरटीजीएस/एनईएफटी/ऑनलाईनव्दारे जमा करावी. त्याची पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहिल.
4. निविदा फॉर्म फीची रक्कम व बयाणा रक्कम भरलेल्या पावतीची सत्यप्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात निविदा अर्जासोबत न जोडल्यास संबंधित निविदाधारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

**D. <u>निविदाधारकांसाठी सुचना –</u>**

1. निविदा धारकांना दि. 29/01/2026 पासून ते दि. 09/02/2026 या कालावधीत कार्यालयीन वेळेत विकत घेता येतील किंवा देवस्थानचे संकेतस्थळ ***<u>www.shanidev.com/tender</u>*** येथून डाउनलोड करता येतील.
2. निविदा उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे. उपस्थित न राहिल्यास ट्रस्टचे खरेदी समितीसमक्ष निविदा उघडण्यात येतील. यासंदर्भात नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.
3. निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स निविदेमधील तक्यात नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा–या निविदाधारकांना निविदा उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.
4. लिफाफा क्रं.1 मधील तांत्रिक निविदेमध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्याच लिफाफा क्रं. 2 मधील दरासंबंधीच्या निविदा उघडण्यात येतील.
5. दरासंबंधीचे परिशिष्टासह प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेली मुख्य निविदा दरासंबंधीचा लिफाफा क्रमांक दोन मध्ये सादर करावी लागेल.

6. **<u>साखर (ग्रेड – सुपर एस) खरेदी करण्यात येणार आहे. त्याचा दर भरतांना विचार करावा.</u>**
7. निविदेसोबत Hard Copy कागदपत्रे सादर करावयाची आहेत.
8. सदर निविदा फॉर्म अहस्तांतरणीय राहील. ज्या नावाने निविदा विकत घेतली असेल त्याच पुरवठादार/कंपनी/संस्था यांना निविदा सादर करावी लागेल.

## E. <u>निविदेत दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे –</u>

1. निविदेमध्ये दर भरतांना GST अगर इतर कुठलाही शासकीय कर तसेच पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च,जकात, वाहतूक, वाराई वगैरे सर्व खर्चासह श्री.शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर येथील भांडार विभागामध्ये पोहोचचे दर या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.
2. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने 1 ऑक्टोबर 2018 पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन 2% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं. 201809281714366605 अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## F. <u>निविदाधारकाने मालाचे नमुने सादर करणे व नमुने निवडण्याची कार्यपध्दती –</u>

1. निविदाधारकाने निविदा भरलेल्या वस्तुंचे 500 ग्रॅम वजनाचे नमुने दि. 29/01/2026 पासून ते दि. 09/02/2026 अखेर सायं. 5 वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शनिशिंगणापूर येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत. नमुने स्वतंत्र प्लास्टिक बरणीमध्ये सिलबंद करून तसेच जमा करताना सोबत त्याची यादी संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. प्लास्टिक बरणीवर मालाचे नांव/प्रकार तसेच आपले फर्मचे नांव, पत्ता, फोन नंबर नमूद करून लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.
2. नमुने तांत्रिक लिफाफ्याबरोबरच जमा करावे लागतील.
3. नमुने तपासणीचा दिनांक व वेळ संस्थानचे *<u>www.shanidev.com/Tender</u>* संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल, त्यासाठी निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनीधी उपस्थित राहू शकतात.
4. एका वस्तुसाठी उच्चतम दर्जाचा एकच नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.
5. निविदाधारकाने वस्तुचे नमुने देताना नमुना निवडीसाठी असा नमुना द्यावा की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या मालाचा संस्थानला पुरवठा होईल.
6. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.
7. निविदेचा जमा करण्याचा कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत जमा झालेल्या तांत्रिक निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेल्या मालाचे नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.
8. निविदा धारक किंवा त्यांचे प्रतिनीधी उपस्थित न राहिल्यास निविदा प्रक्रिया (उदा. नमुने तपासणी, तांत्रिक निविदा उघडणे) पूर्ण करण्यात येईल. याबाबत नंतर कुठलीही तक्रार चालणार नाही.
9. नमुने कृषी विदयापीठाचे तज्ञांमार्फत तपासणी करून पात्र नमुनाधारकांचेच दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यात येतील यावर तक्रार चालणार नाही.
10. नमुने निवडून अंतिम झालेनंतर दरासंबंधीचा लिफाफा उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या त्या–त्या मालाच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांचे दर मा.खरेदी समिती सभेपुढे सादर करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

**निविदा पूर्व बैठक**

- निविदा पूर्व बैठक देवस्थानचे कार्यालयामध्ये दि.03/02/2026 रोजी सकाळी 11.00 वा. आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस ज्या निविदा धारकाने निविदा फॉर्म विकत घेतला आहे. किंवा निविदेमध्ये भाग घेण्यास इच्छुक असलेले निविदा धारक सदर बैठकीस स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनीधी मार्फत उपस्थित राहु शकतात. निविदा पूर्व बैठकीच्या तारखेमध्ये काही कारणास्तव बदल झाल्यास त्यासंबंधीची सूचना व सुधारित तारीख व वेळ *www.shanidev.com/Tender* संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
- निविदा पूर्व बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती संस्थानचे *www.shanidev.com/Tender* संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व निविदा पूर्व बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निविदेच्या काही अटी व शर्तीमध्ये सुधारणा स्पष्टता, बदल करण्यात आल्यास ते मूळ निविदेचा भाग समजण्यात येईल.

**निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक**

- उपरोक्त मुदद्‌ा क्रं. B मध्ये नमूद केल्यानुसार तांत्रिक लिफाफा आणि दरासंबंधीचा लिफाफा स्वतंत्रपणे दि. 09/02/2026 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत देवस्थानचे प्रशासकीय कार्यालयातील खरेदी विभाग येथे निविदा बॉक्समध्ये जमा कराव्या लागतील. विहित वेळेनंतर प्राप्त होणा—या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी.

**G. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा—**

1. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत मालाचापुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या 3% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून ठेवावी लागेल निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर आपण मागणी पत्र दिल्यानंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.
2. श्री.शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर येथे समक्ष येऊन रु. 500/— चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास अदा करावी लागेल. करारनामा केल्याशिवाय बील अदा केले जाणार नाही.

**H. मालाचा पुरवठा करण्याची मुदत —**

1. माल पुरवठा करण्याचा पुरवठा कालावधी 6 महिने राहिल.
2. माल पुरवठा मागणी आदेश दिलेपासून जास्तीत जास्त 08 दिवसात मालाचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेनुसार तात्काळ पुरवठा करावा लागेल.
3. कोणत्याही कारणामुळे जर मंदिर बंद ठेवावे लागले तर अशा कालावधीमध्ये निविदेमध्ये खरेदी करण्यासाठी दर्शविलेले अंदाजे परिमाण (Estimated Quantity) प्रमाणे माल खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.
4. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठाकालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील खरेदीसंबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा 25 टक्केपर्यंत जादा मालाची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या मालाचा पुरवठा मान्य दरानेच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.
5. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे मागणी चलन/आदेश पुरवठादारास पाठविण्यात येतील. त्यामध्ये नमूद परिमाण

इतकाच मालचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेल्या परिमाणा (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे निविदा किंवा पुरवठा आदेशात नमूद मालाइतके परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

**I. मालाचा स्वीकार करण्याची पध्दत–**

1. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचा/साहित्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच मालाचे/साहित्याचे बिल सादर करावे.
2. ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील तो सर्व माल मान्य झालेल्या त्याच दर्जाचा व जातीचा पुरवावा लागेल. कमी दर्जाचा, वेगळ्या प्रकारचा अगर जातीचा किंवा खराब माल स्विकारला जाणार नाही. असा माल पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे व तातडीने चांगल्या दर्जाच्या मालाचा पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. सदोष माल न नेल्यास, त्या मालाची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.
3. पुरवठाधारकाला पुरवठा आदेश दिलेनंतर संस्थानचे खरेदी समितीने आपण दिलेल्या वर्णनाप्रमाणेच माल पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.
4. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे माल पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून मालाची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास माल स्विकारण्यात येईल. तथापि माल स्विकारलेनंतरही त्यातील माल खराब आढळल्यास तो तात्काळ बदलून दयावा लागेल. सबब पुरवठाधारकांनी दिलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरविण्याची दक्षता घ्यावी.
5. पुरवठा करीत असलेल्या मालाची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन माल स्विकारला जातो. तथापी माल स्विकारलेनंतरही एखादा लॉट, गोणी अगर काही माल खराब आढळल्यास तो माल स्वखर्चाने तातडीने बदलून द्यावा लागेल.
6. सर्व माल निवडलेला (Sortex Clean) असावा.
7. माल पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार मालाच्या गोणीवर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असणे बंधनकारक राहील.
8. सदर मालाचे पॅकिंग निव्वळ 50/100 किलो वजनाचे (गोणी व्यतिरिक्त) असावे. ग्रॅममधील वजन बिलासाठी ग्राह्य धरले जाणार नाही.
9. पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा केलेल्या मालामध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.
10. मालाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.
11. पुरविलेले मालाचे गोणीचे वजन वगळता येणारे वजन विचारात घेतले जाईल.
12. निविदेत नमूद केलेल्या मालाचा पुरवठा शिंगणापूर ता.नेवासा, जिल्हा अहिल्यानगर येथील संस्थानचे श्री शनिमंदिराचे जवळील भांडार व प्रसादालय विभागामध्ये अगर कांगोणी रोडवरील संस्थानच्या बर्फी गोडावूनमध्ये करावा लागेल.

**J. लॅब तपासणीची कार्यपध्दती–**

1. पुरविलेल्या मालाच्या आवश्यकतेनुसार बॅचची जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/ NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.
2. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर माल तातडीने बदलून द्यावा लागेल. सदर माल पुरवठा करण्यास विलंब झाल्यास त्यावर थेट L मधील अट क्र.1 प्रमाणे दंड आकारण्यात येईल. तसेच त्या दरम्यान संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेला माल किंमतीच्या थेट

L मधील अट क्रं.1 प्रमाणे दंड देय असलेल्या कुठल्याही मालाचे बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

3. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर आलेला माल वापरला गेला व नंतर लॅब रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील मालाच्या किंमतीच्या थेट L मधील अट क्रं.1 प्रमाणे दंड आकारला जाईल.
4. मालाचा लॅब रिपोर्ट FSSAI Standards नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
5. काही परिस्थितीत संस्थान संलग्नित/संस्थानकडून नेमण्यात आलेल्या लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र/राज्य शासनाच्या शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

## K. <u>बील अदा करण्याची पध्दती –</u>

1. पुरविलेल्या मालाचे बिल मालाची तपासणी करुन, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच अदा करणेत येईल. मालाच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.
2. **<u>मालाची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या मालाचे बील संस्थानकडे सादर केलेपासून 15 दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला अदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणांमुळे बील अदा करणेस विलंब झाला तरीही आपणास संस्थानने मागणी केलेल्या मालाचा पुरवठा थांबविता येणार नाही.</u>**
3. पुरवठाधारकाने पुरविलेला माल संस्थानने नाकारला व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर मालाच्या बिलातुन वसुल केली जाईल.
4. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

## L. <u>आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :–</u>

1. पुरवठा आदेशातील माल मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु. 2.00 लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा 0.50% दराने जास्तीत जास्त 10% पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रु.2.00 लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा 0.50% दराने जास्तीत जास्त 5% पर्यंत |
| पुरवठा न केलेल्या मालाची किंमत रू. 2.00 लक्ष पर्यंत असल्यास अ प्रमाणे दंड करण्यात येईल व त्यापुढील रकमेस ब प्रमाणे दंड करण्यात येवून एकूण दंड रक्कम अ + ब प्रमाणे वसुल करण्यात येईल. | |

2. माल पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगरचलन दिलेपासून जास्तीत जास्त 08 दिवसांचे आत मालाचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे माल नाकारला गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका माल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या मालासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला

करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

**<u>दुरध्वनी/ई–मेलद्वारे कळविलेल्या विहित मुदतीनंतर विलंबाने पुरवठा केलेल्या मालावर थेट L मधील अट कं.1 प्रमाणे दंड आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.</u>**

3. निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या नमुन्याप्रमाणे माल पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने माल पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा माल पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन माल खरेदी करावा लागल्यास जादा येणा–या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. अगर याबाबत संस्थानच्या प्रशासक अथवा समिती/ कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
4. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा. युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर प्रशासक अथवा समिती/ कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
5. निविदाधारकाने स्वतः साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात केलेला दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नसावा. तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नसावे. जर संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

**M. <u>निविदा वैधता कालावधी –</u>**

1. सदर निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदेच्या अंतिम तारखेपासून 60 दिवसांचा राहील.

**N. <u>सर्व साधारण अटी शर्ती –</u>**

1. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.
2. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.
3. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो नेवासा कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.
4. महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर तो न्युनतम दरधारकांच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या 50 टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.
5. पुरवठादाराने मालाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी–शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील 3 वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. अगर याबाबत खरेदी समिती/ कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

6. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. तथापि निविदा फी कुठल्याही परिस्थितीत वा कारणास्तव परत केली जाणार नाही.
7. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी–शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.
8. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
9. **खरेदी विभागाकडून मालाच्या पुरवठ्यासाठी वेळोवेळी केलेल्या ई–मेल व भ्रमणध्वनी आणि दुरध्वनीवरील संवाद/पत्रव्यवहार हा कुठल्याही कायदेशीर कारवाईसाठी (Legitimate Actions) अत्यंत महत्वाचा भाग म्हणून गणण्यात येईल याची प्रथम प्राधान्याने नोंद घ्यावी.**

( अतुल चोरमारे )
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर)

# निविदाधारकाबाबत माहिती

1. फर्मचे नांव – ——————————————————————————————

2. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता– ——————————————————————————————

3. दूरध्वनी क्रमांक – ——————————————————————————————

ऑफीस – ——————————————————————————————
दुकान– ——————————————————————————————
निवास– ——————————————————————————————
मोबाईल नंबर– ——————————————————————————————
फॅक्स नंबर– ——————————————————————————————
ई –मेल – —————————————————————————————

4. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव– ——————————————————————————————
दूरध्वनी / मोबाईल क्रमांक– ——————————————————————————————

5. मालकाचे नाव 1.——————————————————————————————
2.——————————————————————————————

6. बॅक खाते नांव – ——————————————————————————————
शाखा ——————————————————————————————
खाते नंबर व प्रकार ——————————————————————————————
आयएफएससी कोड ——————————————————————————————

दिनांक :– / /2026
ठिकाण :–

निविदा सादर करणारे
नाव ..................................................

स्वाक्षरी ..............................................

शिक्का ...............................................

## अ) तांत्रिक निविदेमधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

1. अदययावत दुकान/संस्था नोंदणी प्रमाणपत्र / कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/ खाजगी कंपनी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

2. GST नोंदणी दाखला/ GST Online Registration Acknowledgement

1. पॅन कार्ड

2. सन 2022–23 व 2023–24, 2024–25 या 3 आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र (किमान वार्षिक उलाढाल रू.50,00,000/– असणे अनिवार्य)

3. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना(FSSAI परवाना)

1. स्वघोषणा पत्र ''परिशिष्ट ब''

2. हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र_निविदा ''परिशिष्ट क''

दिनांक – / /2026

ठिकाण –

निविदाधारकाची सही व शिक्का

## वार्षिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ——————————————————————————————— यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन 2022—23 व 2023—24, 2024—25 या 3 वर्षांची आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| 1 | सन 2022—23 | |
| 2 | सन 2023—24 | |
| 3 | सन 2024—25 | |
| | एकूण | |
| | 3 वर्षांची सरासरी वार्षिक उलाढाल | |

लेखापरीक्षकाची सही / चार्टर्ड अकाउंटंट
नाव / सही शिक्का
नोंदणी क्रमांक.

दिनांक :— / 2026
ठिकाण :—

# परिशिष्ट ''अ''

## दरासंबंधीचा लिफाफा

**फेब्रुवारी 2026 ते जुलै 2026 या कालावधीसाठी साखर पुरवठयासाठी परिशिष्ट**

**श्री. शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर करिता आवश्यक साखर खरेदी करणेकामी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.**

| अ. क्रं | साहित्याचे नाव | ग्रेड | अंदाजीत मागणी कि.ग्रॅ | दर प्रति कि.ग्रॅ. | जी.एस.टी व इतर करांसह | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | साखर | सुपर एस | 126000 कि.ग्रॅ. | | | |

निविदा धारकाचे नाव ..........................................................

सही .......................................................

दिनांक – / / 2026

## <u>परिशिष्ट ''ब''</u>

## स्वघोषणा पत्र

मी निविदाधारक ................................................................................ स्वतः प्रमाणित करतो की, मी स्वतः साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नाही तसेच निविदाधारकाचे नाव संस्थानचे काळया यादीत समावेश नाही. जर संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदा धारकाचे नाव ........................................................

सही ......................................................

दिनांक – / / 2026

# परिशिष्ट ''क''

## हमी पत्र/ निविदा स्वीकृती पत्र

प्रति,
मा. प्रशासक,
श्री शनैश्वर देवस्थान ट्रस्ट,
शिंगणापूर., ता.नेवासा, जिल्हा–अहिल्यानगर.

विषय– निविदा मंजुरीपासून ते 6 महिने करिता साखर पुरविण्याचे निविदेबाबत...

महोदय,

खालील सही करणार मी कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून मला/आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी मान्य करीत आहे.

मी आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या मालाचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर मालाचे परिमाण अंदाजे असल्यामुळे निविदा कालावधीत अगर निविदा कालावधी संपल्यानंतरही पुढील खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा 25% पर्यंत जास्त मालाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे.

ज्या मालाच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने मालाचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर मालाच्या एकुण रकमेच्या 3% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून 07 दिवसांचे आत मी रोख भरणा करण्यात येईल. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहीत केलेल्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे माल वेळेवर शिंगणापूर, ता.नेवासा, जिल्हा अहिल्यानगर येथील देवस्थानचे मध्यवर्ती भांडार विभाग अथवा निविदेत नमुद ठिकाणी पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक – / / 2026
ठिकाण –

आपला विश्वासू,

फर्मचे मालकाचे — सही/सहया व शिक्का
(१) ——————————————————
(२) ——————————————————
सोबत– कागदपत्रे